महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे ४११ ००५

| DIVISINAL CHAIRMAN [illegible] (OFF) | DIVISIONAL SECRETARY 25536781/82/83 25536712 (OFF) | E-MAIL -sscboardpune@gmail.com |
|---|---|---|

तातडीचे

क.पुविमं/यो.प्र./२०२५/ 7711
पुणे - ४११००५
दिनांक- १५/०९/२०२५
18

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये
पुणे/अहिल्यानगर/सोलापूर

**विषय -** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून CBSE व ICSE या बोर्डाच्या विद्यार्थ्यांच्या योग्यता प्रमाणपत्राबाबत.
**संदर्भ -** १. राज्यमंडळ कार्यालय,पुणे यांचे क्र.रा.मं./संशोधन/२४९२ दि. १०.०७.२०२५ चे पत्र
२. या कार्यालयाचे पत्र- क.पुविमं/यो.प्र./२०२५/६४५४ दि.२८/०७/२०२५.
३. राज्यमंडळ, कार्यालय,पुणे यांचे परिपत्रक- क.रा.मं./संशोधन/सकमक्षता/३३३७दि.२३/०८/२०२४

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरून या विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यांना कळविण्यात येते की,

१. CBSE व ICSE बोर्डाच्या विद्यार्थ्यांना योग्यता प्रमाणपत्रासाठी ऑनलाईन आवेदनपत्रे सादर न करता CBSE व ICSE बोर्डाच्या विद्यार्थ्यांच्या यादीसह (प्राचार्यांच्या सही शिक्यासह) इ.११वीसाठी प्रति विद्यार्थी रूपये १०००/- आणि इ.१२वी साठी निर्धारित शुल्क QR Code/UPI व्दारे प्रत्यक्ष विभागीय मंडळात येवून भरणा करण्यात यावे.
२. सदर शुल्क भरणा झाल्यानंतर मंडळाकडून पत्र देण्यात येईल वेगळे योग्यता प्रमाणपत्र देण्यात येणार नाही.
३. या सर्व विद्यार्थ्यांचे पात्र/अपात्रतेचे निकष तपासून सर्व उचित कागदपत्रे कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर जमा करून घेवून त्यांचे जतन करण्यात यावे.
४. योग्यता प्रमाणपत्रासाठी पात्रतेचे निकष संदर्भिय क्र. ३ ला अनुसरून पडताळणी करून नंतरच विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावे. जसे की, इंग्रजीसह पाच विषयात उत्तीर्ण असेल तरच योग्यता प्रमाणपत्रासाठी पात्र आहे. आणि विज्ञान विषयात उत्तीर्ण असेल तरच विज्ञान शाखेत प्रवेश घेण्यास पात्र आहे. या प्रमाणे सर्व निकष पडताळणी करण्यात यावे.
५. CBSE व ICSE बोर्डाच्या नियमित व खाजगी विद्यार्थ्यांसाठी उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करावी.

**सोबत:-** . राज्यमंडळ, कार्यालय,पुणे यांचे दि.२३/०८/२०२४ चे परिपत्रक सुलभ माहितीसाठी देण्यात येत आहे.

Digitally signed by
Kailas Ganpatrao Datkhil
Date: 18-09-2025
17:51:18

(कैलास दातखीळ)
विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ,पुणे

**फक्त CBSE व ICSE बोर्ड करीता यादीचा नमुना**

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नांव | इ.११वी/इ.१२वी | बोर्ड | प्रवेश वर्ष | नियमित/खाजगी विद्यार्थी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

उपरोक्त विद्यार्थ्यांची यादी ही मी तपासली असून त्यांना मंडळाच्या निकषानुसार प्रवेश देण्यात आलेले आहेत. यात काही त्रुटी आढळल्यास यास कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख म्हणून जबाबदार राहील.

सही व शिक्का
मुख्याध्यापक/प्राचार्य
कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव